सं. वाचनालय, ठाणें



IRBK-0116245

सौ. नलिनी सहस्त्रबुद्धे

१६२८४ / ७/६/७५ वा. वा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

4 [illegible] 1975

1[illegible] JUN 1977

4 FEB 1978

22 JUN 1978

बुद्धिविकास माला–क्र. ५

# सूर्यफूल व इतर गोष्टी

सौ. नलिनी सहस्त्रबुद्धे

IRBK-0116245
IRBK-0116245

संजय
प्रकाशन पुणे ४

१९७५

संजय प्रकाशन–एकोणसत्तर

प्रकाशिका
सौ. ललिता शंकर भावे
संजय प्रकाशन
९१७।२२ फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणे ४.


© सौ. नलिनी सहस्रबुद्धे
९१७।१५ गणेश वाडी,
विकास–पुणे ४.

प्रथमावृत्ती
१ ऑगष्ट १९७५

मूल्य ३ रुपये

मुखपृष्ठ–श्री. फेगडे

मुद्रक
ज. ग. जोशी
जनार्दन प्रेस,
१३९९ सदाशिव पुणे.



फार फार वर्षांपूर्वी सूर्यनगरी नावाची खूप मोठी नगरी होती. सूर्यनगरीचे महाराज सूर्यदेव आणि महाराणी सूर्यदेवी या नगरी-वर खूप प्रेम करायची. सूर्यनगरीतल्या प्रजाजनांच्या सुखसोयीकडे जातीने लक्ष पुरवायची. नगरी समृद्ध होती. प्रजा सुखी होती. महाराज आणि महाराणी लाडक्या पुत्राप्रमाणे नगरीतल्या प्रजेचे हट्ट पुरवायची. लाड करायची. पण महाराज आणि महाराणींना पुत्रसंतान नव्हतं. मूलबाळ नसल्यानं दोघं दुःखी होती.

महाराज आणि महाराणी मनोभावे शंकराची भक्ती करायची.

एका सोमवारी सूर्यदेवींनी शंकराची यथासांग पूजा केली. बेल वाहिला. दुधाचा नैवेद्य दाखवला. गाभारा कापूर-उदबत्तीच्या सुवासानं भरून गेला. शंकराच्या पिंडीवर टांगलेल्या सुवर्णकलषा-तून पाण्याच्या एकेक थेंबाचा अभिषेक शंकरावर होत होता. महाराणी ध्यान धरून बसल्या. त्या मनोमन शंकराला विनवीत होत्या.

" शंभो महादेव, माझ्यावर प्रसन्न हो, मला पुत्र दे ! " त्या ध्यानात मग्न होत्या. तेवढ्यात महाराणींची दासी आनंदाने ओरडली,

" आईसाहेब, शंकरानं उजवा कौल दिला. आपली मागणी तो पूर्ण करणार. बघा, बघा तरी. "

महाराणींनी डोळे उघडले. खरंच शंकराच्या पिंडीवरचं उजव्या बाजूचं बेलाचं पान महाराणींच्या हाताजवळ पडलं होतं. त्यांनी ते बेलाचं पान उचललं. आपल्या भाळी लावलं आणि त्या शंकराला हात जोडून म्हणाल्या–

" देवा, खरंच तू कृपाळू आहेस ! "

महादेवाच्या प्रसादाची वार्ता महाराजांना समजली. प्रधानजींना समजली. सगळी सूर्यनगरी आनंदली. उत्सुकतेनं त्या आनंदाच्या दिवसाची वाट पाहू लागली.

आणि एक दिवस सूर्योदयाच्या सोनेरी क्षणी राजवाड्याच्या आतल्या महालातून लहान मुलाच्या रडण्याचा आवाज सूर्यनगरीच्या कानावर आला. प्रजाजन धावले. प्रधान, मंत्री, सरदारांनी राजवाड्यावर गर्दी केली. सगळे महाराजांना विचारू लागले, " काय झाले महाराणींना ? मुलगा की मुलगी ? "

महाराजांनी हसत उत्तर दिले—

" ह्या राजवाड्याला हसवायला, नगरीत कोवळी पावलं उमटवायला, प्रजेला सुखवायला शंभू महादेवानं आम्हाला लेक दिली. "

हत्तीवरून सूर्यनगरीला साखर वाटली गेली. सनई चौघड्याच्या मंजुळ स्वरात वार्ता पसरली

सुर्यनगरीच्या महाराज सूर्यदेवांना आणि महाराणी सूर्यदेवीला मुलगी झाली. सूर्यासारखी तेजस्वी. सुवर्ण रंगाची. नाव ठेवलं गेलं सुवर्णकांती.

सुवर्णकांतीचे लाड करायला महाराणी-महाराजांबरोबरच सगळे मंत्री, प्रधानजी, सरदार, दरकदार, प्रजाजन पुढे झाले.

सुवर्णकांती वयानं वाढत होती. महाराज-महाराणींना आपल्या नाना चाळ्यांनी सुखवीत होती. राजवाड्यातल्या नोकरचाकरांना झुलवीत होती. तिचे कोडकौतुक पुरवायला प्रजेलाही आनंद वाटायचा.

महाराणी लेकीच्या कौतुकात दंग होत्या. दिवस पालटत होते. सुवर्णकांती हट्टानं आपलं कौतुक करवून घ्यायची. महाराणी तिला मांडीवरून खाली ठेवायला लागल्या की ती मोठ्ठा गळा काढायची. मग महाराणींना तिला मांडीवर घेऊनच वेणीफणी उरकावी लागायची. महाराजांच्या मांडीवर बसून ती त्यांच्या ताटातला घास खायची. जेवताना महाराज तिला खाली ठेवायला लागले की झालं रडणं सुरू. मग महाराणी म्हणायच्या–

"द्या तिला घटकाभर मांडीवर. एकुलती एक नवसानं झालेली पोर."

महाराजांचा नाइलाज व्हायचा. ते तस्से तिला मांडीवर घेऊन अवघडत आपलं जेवण संपवायचे. सगळ्यांच्या लाडानं राजकुमारी हट्टाला सरावली होती. दासींना, प्रधानजींना, प्रजेलाही या तिच्या हट्टाच्या गंमती कळायच्या. पण अजूनही सगळे तिच्या कौतुकातच दंग होते. म्हणत होते, "चार वर्षांची पोर. जरा मोठी झाली की होईल हट्ट कमी."

महाराणी व महाराज बोलत असली की महाराणी म्हणायच्या–

"महाराजांनी तिचे एवढे लाड करू नाही. नाहीतर डोक्यावर बसेल हं. आपण दरबारात निघालात की चिकटते. आमचं एक काम धड होऊ देत नाही, सारखा आपलाच हट्ट पुरवून घेते. नाही म्हटलं की लगेच रडण्याचा सूर धरते."

त्यावर महाराज लेकीला कुरवाळत म्हणायचे–

"हे पहा मोठी झाली की होईल हट्ट कमी. एकुलती एक आमची लाडकी सुवर्णकांती. आम्ही प्रजेचा हट्ट पुरवतो. आता लेकीचा पुरवू द्या."

महाराणी लेकीला महाराजांच्या मांडीवरून आपल्या कडेवर घेत तिच्या गालावर आपले ओठ टेकीत म्हणायच्या–

"खरं आहे महाराजांचं. लाडकी लाडकी म्हणून सर्वांनी तिचे हट्ट पुरवायचे. फक्त तुम्ही आम्हाला दोष द्यायचा. आम्ही तुम्हाला. आणि शेवटी दोघांनीही तिचे हट्ट पुरवायला, लाड करायला, कौतुक करायला पुढं व्हायचं."

पाच वर्ष गेली. सहाव्या वर्षाचा वाढदिवस खूप मोठ्या थाटात सुरू झाला.

राजवाडा शृंगारला गेला. महाद्वारावर सनई चौघड्याचे स्वर घुमू लागले. राजवाड्यात पक्वान्नांचे वास दरवळू लागले. महालात लहान मुलांच्या पंगतीची गर्दी उडाली. गोड गोड पदार्थांनी ताटं भरली. सगळी मुलं आनंदात जेवत होती.

मध्यभागी चांदीच्या चौरंगावर सोन्याच्या ताटात राजकुमारी जेवत होती. चांदीच्या भांड्यातले पाणी राजकुमारीनं ओठाला लावलं. पाणी कोमट लागताच तिनं सेवकांना सांगितलं–

"मला गार गार पाणी हवं." झालं, सगळ्यांची बर्फ आणायला धांदल उडाली. सेवकांनी बर्फ आणून तांब्यात टाकला. तो बर्फाचा

खडा बघून राजकुमारी आनंदली आणि एकदम ओरडली.

"मला खूप मोठ्ठा बर्फाचा खडा हवा...अं...आधी आणा. जा. जा."

महाराणींनी आणखी दुसरा, मोठ्ठा बर्फाचा खडा आणला. राजकुमारीजवळ चांदीच्या मोठ्या परातीत ठेवला. जेवणं चालू झाली. बर्फाचा खडा विरघळून लहान होत होता. राजकुमारीनं ते पाहिलं आणि मोठ्ठा सूर धरला.

"हा नको जा... मला मोठ्ठा खडा हवा. महालाएवढा मोठ्ठा... कधीही न विरघळणारा... द्या आणून आधी."

जेवणं थांबली. महाराणी गोंधळल्या. महाराजांना बोलावणं गेलं. महाराज आले. त्यांनी राजकुमारीची समजूत घालायचा प्रयत्न केला. पण राजकुमारी आपला हट्ट सोडीना. ती सूर धरून बसली.

"मोठ्ठा बर्फ महालाएवढा—न विरघळणारा आणून द्या."

मग प्रधानजींनी युक्ती केली. महालात बर्फाचा मोठ्ठा थोरला खडा ठेवला. तो विरघळायला लागला की त्याच्या मागोमाग दुसरा मोठ्ठा बर्फाचा खडा राजकुमारीची नजर चुकवून सरकवला जायचा. ते बघून राजकुमारी आनंदली. सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. सहावा वाढदिवस पार पडला.

एक दिवस दुपारच्या उन्हाच्या वेळी महाराज महालात विश्रांती घेत होते. राजकुमारी हलक्या पावलांनी येऊन त्यांच्या पलंगावर चढली. महाराजांनी तिला आपल्या मांडीवर बसवली. आणि ते म्हणाले–

"सूर्यकांती, दुपारची विश्रांती घ्यायची सोडून इकडे कशी आलीस बरं. चल ये जरा पड. मग जा खेळायला.,"

राजकुमारी महाराजांच्या पाठीवर चढली आणि गळ्यात हात टाकून लाडिकपणे म्हणाली,

" बाबासाहेब, आम्हाला आज खूप कंटाळा आलाय. आपण आज छान छान खेळ खेळू."

" हो खेळू हं. जरा आमची विश्रांती पुरी होऊ द्या. मग खेळू."

" अहं—मग नाही आत्ता खेळायचं. तुम्ही घोडा व्हा. मी तुमच्या पाठीवर बसेन. मग ह्या महालात घोडा पळवायचा..."

" हे बघ... आता उन्हाची वेळ—मग मी तुला पाठीवर घेईन. उन्ह उतरू देत."

महाराजांनी तिला समजावायचा प्रयत्न केला. पण राजकुमारी हट्टाला पेटली. आता ही रडून दुपारच्या शांत वेळी सगळ्यांना त्रास देणार असं बघताच नाईलाजानं महाराज पलंगावरून खाली उतरले.

त्यांनी गुडघे टेकले आणि राजकुमारीला पाठीवर घेऊन " घोडा, घोडा " करीत महालात चौफेर फिरवायला सुरुवात केली. तेवढ्यात महाराणी सरबताचे पेले सेवकाबरोबर घेऊन आत आल्या.

" बाळे सुवर्णकांती, आज महाराजांचा घोडा करून त्यांना दमवतेस होय. आता पुरे हं. किती दमले बघ महाराज. आता उतर खाली. या बघू, सरबत घ्या गार गार. "

महाराणींनी तिला महाराजांच्या पाठीवरून खाली घेण्याचा प्रयत्न केला. पण राजकुमारी खाली उतरली नाही. ती हटून म्हणाली,

" आम्ही आमच्या घोड्यावर बसूनच सरबत पिणार. बाबासाहेबांनाही द्या. ते तसेच घोडा करून सरबत पितील."

महाराणी धास्तावल्या. आता ही महाराजांना रात्रभर असा घोडा करून दमवणार की काय ? म्हणून त्या थोड्या नरमाईने म्हणाल्या—

" बरं, घ्या तुम्ही सरवत तसंच. पण थोड्या वेळानं सरबत पिऊन झालं की राजकुमारी उतरणार खाली. होय ना ? मग संध्याकाळी फिरायला जायचं. "

" अहं... मी नाही उतरणार. आज सबंध दिवस महाराज आम्हाला घोड्यावर बसवणार. आज-उद्या–परवा खूप दिवस..."

तिचे ते शब्द ऐकताच महाराज घाबरले. ते चाचरत दमल्या स्वरात म्हणाले,

" सुवर्णकांती, आज संध्याकाळपर्यंत बसा हं आमच्या पाठीवर. मग प्रधानजी येणार आहेत. मंत्री येतील. उद्या किनई दसरा आहे. दरबार भरवायचा. सगळ्यांना शिलंगणाला जायचं. सोनं लुटायचं. आता उतरणार ना खाली ? "

राजकुमारीनं मान हलवली. आणि तश्शी पाठीवर बसून राहिली. सगळ्यांनी समजावलं. पण कुणाच्याच सांगण्याचा उपयोग झाला नाही. दसरा महाराजांशिवाय पार पडला. सगळी घाबरून गेली. राजकुमारीच्या हट्टानं महाराजांना तिला रात्रभर घोडा करून पाठीवर बसवावी लागली. त्या श्रमाने महाराज आठ दिवस अंथरुणावर पडले. त्यांचे गुडघे दुखावले. पाठ अवघडली. सगळ्यांनाच आता राजकुमारीच्या हट्टाची काळजी वाटायला लागली.

दिवस पुढे जात होते. बावरल्या मनानं सगळी राजकुमारीशी वागत होती. सगळ्यांच्या मनात एकच भीती असायची ही आता कोणता हट्ट धरणार. थंडीतसुद्धा महाराजांना व महाराणींना घाम सुटायचा.

एकदा सहज राजकुमारी राजवाड्याच्या गच्चीवर उभी होती. नगरीतल्या उंच घरांच्या सौधांवरून मुलांचे घोळके पतंग उडवताना तिला दिसले. आनंदून ती खाली महालात आली आणि महाराणींना हाताला धरून ओढत म्हणाली,

"आईसाहेब, चला आपण पतंग उडवू."

"पतंग उडवायचा का माझ्या बाळीला. थांब हं, सांगू आपण तुझ्या मैत्रिणींना बोलवायला. छान मोठ्ठा पतंग आणू." राजकुमारीला आपल्याजवळ बसवून घेत महाराणी म्हणाल्या.

"त्यांना नको बोलवायला. आपण दोघी उडवू पतंग. तुम्ही दोऱ्याचं रीळ धरा, मी सोडीन पतंग वरवर. खूप मज्जा येईल."

"हे बघ सोनकांती, तुला मज्जा येईल. पण आमची निघेल वरात. आज मी न्हाऊन केस वाळवतेय. उन्हात उभं राहिलं तर मला चक्कर येईल." महाराणी तिला अजीजीनं म्हणाल्या.

"ते काही नाही. तुम्हीच आलं पाहिजे. आधी चला...अं... नाहीतर मी रडेन."

राजकुमारीनं पाय पसरले. मोठ्ठा सूर लावला. सगळा राजवाडा दणाणला. नगरीत वार्ता गेली. महाराज दरबार घाईनं संपवून राणीसाहेबांच्या महालात आले. आणि महाराज महाराणींना एकीकडे घेऊन खालच्या स्वरात रागावून म्हणाले,

"अहो काय हे ? जा आधी तिला पतंग उडवायला मदत करा. तिचं रडू आम्हाला नाही बघवत. आम्ही तिच्यासाठी घोडा घोडा करून तिचा हट्ट पुरविला."

"पण महाराज... हे-हे दुपारचं कडक ऊन आम्हाला झेपणार नाही. आम्ही कधी महालाच्या बाहेरही अशावेळी पडत नाही आणि..." त्या काकुळतीनं म्हणाल्या.

" हे बघा जा थोडा वेळ मदत करा. मग तीच कंटाळेल. अहो आता तिला बारावं सरून तेरावं वर्ष लागलं. दोन तीन वर्षांनी सासरी गेली की मग कशाला तुम्हाला त्रास द्यायला येईल. जा पुरवा तिचा हट्ट."

महाराणीचा नाईलाज झाला. त्यांनी कमरेला पदर खोवला आणि राजकुमारीला घेऊन त्या सौधावर आल्या.

राजकुमारीनं पतंग आभाळात सोडला. पतंग वाऱ्यावर डोलत होता. नाचत होता. वरवर आभाळात उंच चढत होता. आणि दोऱ्याचं रीळ उलगडता उलगडता धावून धावून महाराणी थकल्या होत्या. घसा कोरडा पडला होता. चेहरा लाल झाला होता. अंगातून घामाच्या धारा वहात होत्या. दिवेलागणीनंतर राजकुमारी कंटाळली. महाराणी व ती खालच्या महालात आल्या. महाराणीनं त्या दिवशी जे अंथरुणावर अंग टाकले ते पंधरा दिवसांनी त्या उठल्या.

आता मात्र सगळी सुवर्णनगरी काळजीत पडली. राजकन्या दिसायला देखणी, स्वभावानं चांगली, सगळ्यांना आवडायची. पण...पण तिचा काहीतरी चमत्कारिक हट्ट पुरवायचा म्हटलं की सगळ्यांचा जीव घाबरून जायचा. प्रत्येक दिवस पार पडला की वाटायचं उद्या कुठला हट्ट पुरवावा लागणार. तरीसुद्धा महाराज, महाराणी, प्रजाजन तिचा प्रत्येक हट्ट एकुलती एक म्हणून पुरवीत होते. त्यासाठी राबत होते. कष्ट घेत होते.

राजकुमारीनं स्वत:साठी महाराजांकडून एक छानदार महाल बांधवून घेतला. मोठ्या तलावाच्या मधोमध. तलावाचं पाणी आटलं की बांधकामाला सुरुवात व्हायची. महाल पुरा झाला. महालाच्या मुख्य दरवाजापासून तलावाच्या काठापर्यंत उतरती

वाट बांधली. खांब रोवून त्या काठापलीकडे मोठी बाग तयार झाली. राजकन्या त्या महालातच राहायची. अलिकडे राजकुमारीचा बरेच दिवसात काही हट्ट नसल्याने महाराज व महाराणी आनंदात होती.

महाराज एकदा आपल्या महालात महाराणीशी सोंगट्या खेळत होते. खेळता खेळता ते म्हणाले,

"पाहिलंत आता कशी छान वागते. कसला हट्ट नाही बिचारीचा."

"खरंच बाई, आपण तिच्यासाठी तळ्यातला महाल बांधून दिलात. माझी सोनकांती खूष झालीय. महाराज, आता तिच्यासाठी नवरदेव शोधावा. सतरावं वर्ष लागलं तिला."

"हो, आणू आता जावई. एकुलतीएक म्हणून खूप हट्ट पुरविले तिचे. आता मात्र शहाणी झालीय. आता जावई शोधू. लग्न लावून देऊ आणि त्या दोघांच्या कौतुकात आपले दिवस घालवू." महाराज एवढं म्हणतात तोच राजकुमारी महालात आली. तिनं खाली वाकून दोघांना नमस्कार केला.

"या या बाईसाहेब. केवढी मोठी झालीस बघता बघता. हं. बसा. आता आम्ही तुमच्यासाठी नवरा शोधणार... लग्न करायचं तुझं. आम्हाला जावई येणार." महाराज तिला शेजारच्या आसनावर बसवित आनंदून म्हणाले.

राजकुमारी हसत, लाजत बैठकीवर बसली.

तिला बघून महाराणी म्हणाल्या "पाहिलत किती शालीन, गुणाची पोर झाली आहे ती. आता जावई बघावा. शूरवीर सूर्यासारखा तेजस्वी..."

महाराणींच बोलणं अपुरंच राहिलं. राजकुमारी खाली मान घालून लाजत म्हणाली,

" महाराज ··· मी ··· मला सूर्याशीच लग्न करायचं आहे ·" महाराणी ताड्कन उठल्या आणि जोरात म्हणाल्या,

" काय म्हणालीस सूर्याशी लग्न करायचंय ? "

महाराजही घाबरले. ते आपल्या लेकीकडे बघत म्हणाले,

" अहो सूर्याशी असं चुकून म्हणाली. सूर्यासारख्या तेजस्वी राजकुमाराशी तिला लग्न करायचं आहे. सूर्याशी लग्न कसं करतां येईल. खरं ना बाळ ? "

" महाराज मी खरंच सांगितलं मला सूर्याशीच लग्न करायचंय. आई–बाबा, माझे एवढे हट्ट पुरवलेत आता हा हट्ट पुरवणार ना ! " राजकुमारीनं काकुळतीनं विचारलं.

महाराजांच्या डोक्यावर वीज कोसळली. ते म्हणाले,

" वेडे –अग सूर्याच्या जवळ जाणं तरी शक्य आहे का ? त्याच्या जवळ जायचं म्हणजे – मरण. इतक्या लांबून त्याचा ताप सहन करवत नाही. तर जवळ कसं जातां येईल. "

" ते कांहीं नाही. तुम्ही काय वाटेल ते करा पण मला सूर्याशीच लग्न करायचंय ··· " ठामपणे राजकुमारी म्हणाली.

" ते होणार नाही. तुझा हा हट्ट आम्ही चालू देणार नाही. लहान होतीस म्हणून तेव्हा गय केली आता मात्र... " राजेसाहेब बेभान होऊन ओरडले.

" मी सूर्याशीच लग्न करीन " असं म्हणत राजकन्या झटक्याने महालाबाहेर पडली.

महाराजांनी तिचं मन वळवण्याचा खूप प्रयत्न केला. प्रधानजींनी तिला समजावलं. सख्यासोबतीणींनी तिला विनवलं पण कशाचाच

उपयोग झाला नाही. महाराज रागावले. तिला त्यांनी कोंडून ठेवली. राजकुमारीनं अन्नपाणी वर्ज केलं. ती सारखी म्हणायची " मला सूर्याशीच लग्न करायचं आहे. " ती आपल्या महालाच्या खिडकीतून सारखी सूर्याकडे बघत बसायची. तिचे हाल महाराणींना बघवेनात. त्या तिला एक दिवस बागेत घेऊन आल्या. खूप समजावलं तिला. पण नाही, तिनं आपला हट्ट सोडला नाही. ती तशीच सूर्याकडे टक लावून बघत बसली. सूर्य डोक्यावर आला ... आणि त्यांचा तो ताप त्या अशक्त झालेल्या राजकुमारीला सहन झाला नाही. ती तिथंच खाली पडली. राजकुमारीचे प्राण निघून गेले.

महाराज–महाराणी दु:खी झाली. कन्या मिळाली पण ती हट्टापायी हे जग सोडून गेली. प्रजाजन उदास झाले.

रोज महाराज व महाराणी ती पडली त्या जागी येऊन तिच्या एकेक आठवणी काढत बसायची. दोघांच्या डोळ्यांतल्या पाण्याच्या धारा ओघळून भूमीवर सांडायच्या.

आणि काय आश्चर्य ! एक दिवस महाराणींना त्या जागी एक रोपटं अंकुरलेलं दिसलं—एक दिवस गेला—दुसरा गेला. रोप वाढत होतं. हिरवी हिरवी पानं फुटली—वाऱ्यानं सळसळू लागली आणि एक दिवस एक कळी डोकावली—सूर्याचे किरण पडले त्या कळीवर. कळी फुलली. पिवळ्या, केशरी, लांबट पाकळ्यांचं मोठं फूल उमललं. ते फूल टक लावून सूर्याकडे बघत होतं. सूर्य माथ्यावर आला. फुलानं मान वर केली. सूर्य पश्चिमेला कलला. फुलानं पश्चिमेला मान वळवली.

राजाराणी बघत होती. राणीसाहेबांना कोडे उलगडले. त्या घाईघाईने अधीर स्वरात म्हणाल्या,

" महाराज...ही आपलीच सोनकांती. सूर्याच्या ओढीनं पोरीनं इथंच प्राण सोडला...पण पुन्हा फुलाच्या रुपानं आपला हट्ट सुरू करायला आली... हट्टी पोर...सूर्यफूल झाली...सूर्यफूल ! "

अजून ती फुलं फुलतात आणि आपला हट्ट पुरवतात.





धनदास सेठजी आणि साधुदास एकाच गावी राहणारे. दोघांची लहानपणापासून खूप मैत्री. शाळेतसुद्धा एकाच जायचे.

धनदासला नावाप्रमाणेच धनाचा, द्रव्याचा म्हणजेच पैशाचा खूप लोभ होता, साधुदासला तो नेहमी म्हणायचा–

" हे बघ साधू, जगात फक्त पैशालाच मान आहे. खूप पैसे मिळवणार मी !"

" मिळव बाबा. मला पोटापुरते मिळाले की बस्स. धना, तुला वाटतंय पैशानंच सगळं मिळतं पण माझं मत तुझ्या विरुद्ध आहे. आपण सर्वांवर दया, माया, प्रेम दाखवावं, अडचणीला उपयोगी पडावं की मग आपोआप धनसंपत्ती मागं येते !"

धनदासला त्याचं खूप हसू यायचं. शाळेत कुणाचं काही अडलं की आपला अभ्यास मागं ठेवून साधू मित्रांना समजावून द्यायचा.

गणितं सोडवायला मदत करायचा. पण धनदास कोणालाही काही मदत करायचा नाही. तो म्हणत असे लोकांना पुस्तकं वापरायला दिली तर ती फाटतील, लोकांना शिकवताना आपला वेळ फुकट जाईल. त्यापेक्षा कोणाला काही मदत करू नाही. असं करता करताच दोघंही मॅट्रिक पास झाले.

धनदासानं त्याच गावात किराणा मालाचं दुकान घातलं. खूप जोरात दुकान चालायला लागलं. धनदासला पैशाचा लोभ सुटला. तो जास्त पैसे मिळविण्यासाठी धान्यात खडे घालायचा, मिठात, पिठात कसलीतरी भेसळ असायची. अडलेल्यांच्याकडून तो दुप्पट पैसे घेऊन माल द्यायचा. असं करून धनदासनं खूप पैसा जोडला. रोज रात्री तो आपल्या दुकानवरचा गल्ला मोजायचा. रुपयांचा छनछन आवाज आला की त्याला आनंद व्हायचा.

साधूदासही त्याच गावात एका ठिकाणी नोकरी करायचा. रोज कामधंदा आटोपला की दोघं मित्र गप्पा मारायला बसायचे. धनदास विचारायचा–

"काय रे साधू, किती पैसे साठविलेस. मी खूप पैसा मिळवणार. अगणित. आणि मग जीवनात आनंद मिळवणार."

"धनदास, मी सुद्धा अगणित पैसा मिळवलाय. रोज रात्री मी मोजायला बसतो. शेवटी झोप यायला लागते. सकाळी जाग येते. लगेच रोजच्या कामाला सुरुवात !"

एकदा काय झालं गावात गुरांच्या रोगाची साथ आली. रामजीनं धनदासाकडून कर्ज काढून बैलाची जोडी आणली. पण त्या गुरांच्या साथीत गुरं मरून गेली. शेतावरची कामं बंद पडली. मोट चालेना, पीक वाळून जायला लागलं. एक दिवस दिवेलागणीला

साधूदास रामजीकडे गेला. रामजी कपाळाला हात लावून बसला होता. साधूदास येताच रामजी रडत म्हणाला,

" साधू, फार अडचणीत आलोय मी. गुरं मेली. मला रोज ताप येतो. काम होत नाही. बघ शेताची दशा. मोटेचं पाणी बंद झालंय. सगळं पीक वाळून जाणार. काय करू रे ?"

" रामजीबाबा, धीर सोडू नका. हे हजार रुपये घ्या. धनदासाचं कर्ज फेडा. औषध आणा. प्रकृती धड होऊ दे तुमची आधी. आणि हे पहा आजपासून थोडा वेळ मी आणि माझे दोस्त तुम्हाला शेतीच्या कामात मदतीला येऊ ! "

रामजी आनंदला. तो साधूदासला म्हणाला, "पोरा, शाळा शिकलास, चीज केलंस शिकण्याचं. देव तुझं भलंच करील ! "

रामजी धनदासाकडे गेला आणि त्याला म्हणाला,

" शेठजी... कर्ज फेडायचंय माझं पण आता थोडे पैसे देतो. थोडे मग फेडीन ! "

धनदास त्याच्यावर ओरडला,

" हे बघ, सोंगं-ढोंगं पुरे. माझे हजार रुपये आधी दे. असा तुमच्यावर सारखी दया, माया दाखवायला लागलो तर मला कधीच समाधान मिळणार नाही. मी माणूस आहे. मला माझं सुख पाहिलं पाहिजे. "

नाईलाजानं रामजीनं सगळे पैसे चुकते केले. साधूदास मात्र रामजीच्या मदतीला यायचा. त्याच्या मित्रांनी आणि त्याने रामजीच्या शेतीत मदत केली. आणि श्रमाचं सार्थक झालं. सगळे साधूदासला नावाजू लागले. साधूदास त्याला होईल तेवढी मदत करायचा.

साधूदास एकदा शहरात गेला होता. परत यायला त्याला

दुपारचे बारा वाजले. बरोबर शेठजी धनदासही होते. दोघंही बोलत चालले होते. गावाजवळ आले तोच त्यांना गावाबाहेरच्या वडाच्या झाडाखाली शामभटजीचा सदू खाली मान घालून बसलेला दिसला. धनदास पुढे झाला आणि त्याला म्हणाला,

" काय रे शाळा चुकवून इथं बसलास होय. छान ! बापाला वाटणार पोर शिकतंय आणि तुम्ही इकडे उनाडक्या करा ! "

" धनदास थांब रे, बघ पोराच्या डोळ्यात पाणी आलंय. काहीतरी वेगळंच दिसतंय मला. काही अडचण असेल त्याला. सदूभाऊ, अरे इथं का बसलास ? आणि डोळ्यात पाणी का रे ? सांग बरं ! "

सदूला हुंदका आवरेना. तो रडत म्हणाला,

" साधूदादा... खूप दिवसांपासून बाबा आजारी आहेत. घरात सगळीच ओढाताण चालू आहे. पैसा पुरत नाही म्हणून म्हणून शाळा सोडावी लागणार...फी दिली नाही म्हणून मास्तर वर्गात बसू देत नाहीत...बाबांना कळू नाही म्हणून इथं येतो. "

" वेड्या मग पैसे मागायचे. कुणातरी मोठ्या माणसाला अडचण सांगायची !" साधूदास कळवळ्याने म्हणाला,

" मी...मी गेलो होतो पैसे मागायला शेटजींकडे... पण नाही म्हणाले ! "

" मग नाहीतच पैसे माझ्याकडे. मी नाही देत कुणाला पैसा. असे पैसे वाटत सुटलो तर माझं कसं व्हायचं !"

" ठीक आहे, तू नको देऊ पैसे. हे बघ सदू मी करीन हं व्यवस्था. जा, आजपासून शाळेत जा. शामभटजी सांगत होते, तुला डॉक्टर व्हायचंय म्हणे. हं उठा डॉक्टर...असे रडू नका. डॉक्टर व्हा आणि या खेड्यात दवाखाना काढा. "

सदूला खूप आनंद झाला. तो डोळे पुसून उड्या मारीत निघून गेला. तो गेल्यावर साधूदास धनदासाकडे वळून म्हणाला,

" हा मुलगा मोठा हुशार आहे. बिचाऱ्याला पैसा नाही म्हणून शिकायला नाही असं व्हायला नको !"

" साधू, अरे लोकांचं सारखं करीत बसलास तर तुझं कसं होणार ? मी बघ खूप पैसा साठवतोय."

" धनदास, तुला सांगू माझ्याकडेसुद्धा अगणित संपत्ती जमतेय. दाखवीन तुला कधीतरी !"

दिवस, वर्ष पुढे जात होती. साधूदासच्या आणि धनदासच्या दोघांच्याही संपत्तीत भर पडत होती. पण दोघांचंही धन वेगळं होतं दोघांच्याही संपत्तीचं स्वरूप वेगळंच होतं.

धनदासाच्या घरी कार्य निघालं. धनदासने गावातल्या रामजीला बोलावणं पाठवलं. रामजी तावडतोब आला. दुकानाच्या ओटीवर टेकला आणि हसत धनदासला म्हणाला,

" शेठजी का बोलावलंत ?"

" रामजी, थोरल्या लेकाचं लग्न आहे. तेव्हा तुझ्या मळ्यातला भाजीपाला, फुलं हवीत आम्हाला. आणि फळबागही चांगली झालीय म्हणे तुझी तेव्हा..."

" होय शेठजी, माझा मळा आता चांगला बहरलाय. मागे मी आजारी होतो. तुमचं कर्ज होतं... पण ते फेडायला मदत केली साधूदासानं. आता पोरं मोठी झाली. सगळी राबतात मळ्यात. फुलं, फळं, भाजीपाला यथास्थित होतोय. पण—शेठजी आपल्याला माझ्या मळ्यातला माल घ्यायला दामदुप्पट पैसा द्यावा लागेल. हवं तर घ्या नाहीतर आणा शेजारच्या गावातून !"

"अरे पण, तुम्हींच साधूच्या मुलीच्या लग्नात सर्व पुरवलं होतं. फार तारीफ केली लोकांनी..."

"हो आम्हीच पुरवलं सगळं. आणि तेसुद्धा पैसे न घेता ! साधूदासांच्या प्रेमानं केलं आम्ही. शेठजी प्रेम द्यावं लागतं, प्रेम घ्यावं लागतं. पैशानं नाही सर्व मिळत." रामजी रागानं म्हणाला आणि उठून गेलासुद्धा.

धनदास खूप चिडला. त्याला राग आला. सगळे त्याच्याशी असंच वागायचे. पूर्वी त्याने लोकांना नाडून पैसा मिळवला त्याचा वचपा लोक काढायला लागले. त्याची काही अडचण असली की त्याच्या जवळून दामदुप्पट पैसा मागायचे. मदतीला यायचे नाहीत. आले तर कसंबसं एकदाचं काम उरकून टाकायचे. एकदा धनदासाला एका औषधाची मुळी हवी होती. त्याला समजलं होतं गावात फक्त शामभटाकडेच ती आहे. धनदासने ती मागितली शामभटाकडे. भटजींनी निरोप धाडला, "होती. पण आता कुठे आहे ती सापडत नाही." शेवटी धनदास त्यांच्या दारात गेला आणि आर्जीजीनं म्हणाला,

"भटजी शोधा मुळी. हमखास उपाय असं समजलंय. वाटलं तर कसाभर पैसा देतो."

"पैसा नको शेठजी, औषधाचा पैसा घेऊ नाही. आता फक्त असं करा दुकानातून एक साखरेचं आणि एक तांदुळाचं पोतं पाठवा. मुळी धाडतो !"

शेठजी नाइलाजाने कबूल झाले. एक दिवस शेठजीला समजले साधूदास आजारी आहे. त्याला मोठंच दुखणं झालंय. साधूला भेटायला धनदास आला. तशी साधूची प्रकृती जराशी बरी होती. पण ऑपरेशन करावं लागणार होतं

"ये शेठजी, बरा आलास. धंदा काय म्हणतो ? पैसा किती मिळवलास ? ठीक आहेस ना ?"

"हो बरा आहे मी. पण आपले गावकरी मोठे लबाड लोक. अरे मी नुसती मुळी मागितली तर साखरेचं पोतं आणि तांदुळाचं पोतं मागितलं त्या शामभटांनी !"

"अरे खरंच आपल्या शामभटजींचा सदू मोठा डॉक्टर झालाय म्हणे !" साधूदास कौतुकानं बोलला.

"हो म्हणे. पण एक मुळी द्यायची तर एवढा खर्च. मागे बघ रामजीला बोलावलं बागेतली फुलं, फळं भाजी मागितली तर दामदुप्पट पैसा दे म्हणाला. फार उर्मट झालेत हे गावकरी. पण तुझ्या मुलीच्या लग्नात मात्र सगळं कसं व्यवस्थित आणलं होतं." धनदास रागानं धुसफुसला.

एक दिवस धनदासला निरोप आला. साधूदासची प्रकृती बिघडली आहे, तो तसाच दुकानाचं काम टाकून साधूदासच्या घरी गेला. साधूदास अंथरूणावर पडला होता. खूप अशक्त झाला होता. धनदास त्याच्या जवळ बसला. साधूदासला भेटायला माणसांची रीघ लागली होती. म्हातारी, तरणी, मुलं, बाया सगळी त्याला बघायला येत होती. रामजी आला त्याच्या पाठोपाठ फळांची करंडी घेऊन त्याचा मुलगा आत आला.

"ठेव तिकडे कोपऱ्यात. आणि साधूदासाच्या सूनबाईला सांग ताजी फळं आणलीत. दे रस काढून दादांना. आणि लागली तर कळव. संकोच करू नको." रामजी साधूदासाचे पाय रगडीत म्हणाला.

धनदास ते बघत होता.

तेवढ्यात साधूदासने डोळे उघडले तो रामजीला म्हणाला,

" रामजी, कशाला कष्ट घेतोस, माझ्यापेक्षा तू वयानं मोठा. मीच तुला मदत करायची !"

" असू दे साधू. तुला बरं नाही समजलं. घरी बसवेना !"

तेवढ्यात पाटीलदादांची सून आली आणि साधूदासाच्या पायाला हात लावून म्हणाली,

" दादा, परमेश्वर तुम्हाला लवकर बरं करू दे. मला मरणाच्या दाढेतून काढलीत आणि आता आपण आजारी झालात. किती गोरगरीबांवर माया लावलीत. सगळ्यांच्या अडीअडचणीला उभे राहिलात. दादा . . . "

तिच्या डोळ्यांतून अश्रूधारा लागल्या.

साधूदास तिला समजावीत म्हणाला,

"पोरी रडू नको. त्या दिवशी मी बाजारातून आलो. दिवे लागणीची वेळ, तुझ्या डोक्यावर मोळी, तुला मागून आलेली मोटार दिसली नाही म्हणून मी मागून तुला ओढली. आता मला थोडी जखम झाली. पण पोरी तुझा जीव बचावला. घरी तुझी लहान मुलं. माझं काय, मी आता संसारातून मुक्त झालो. पोरं सगळी जबाबदारी घेतात घराची . . . . "

" साधूदास, पण आता तुझं मोठं ऑपरेशन आहे म्हणे. खूप पैसे लागणार असं म्हणतात . . . "

हो .... पण मी मिळवलीय अगणित संपत्ती..... होईल कसंतरी. आणि हे बघ आता जरी वरचं बोलावणं आलं तरी..."

" छे असं नको बोलू " तेवढ्यात बाहेर मोटारचा हॉर्न वाजला. आणि दारातून दोघंतिघं शहरातली माणसं आत आली. धनदासनं ओळखलं. त्यातला एक होता शामभटजींचा सदाशिव. डॉक्टरकीच्या परीक्षा देत होता शहरात. तो पुढे झाला. त्यानं

त्या आलेल्या गृहस्थांना बसायला सांगितलं आणि तो साधूदासला म्हणाला,

" साधूदादा, ही मोठी डॉक्टर मंडळी आलीत तुमची प्रकृती बघायला. आम्ही तुम्हाला मोठ्या दवाखान्यात नेणार आहो. काही काळजी करू नका. "

साधूदासने सगळ्यांना नमस्कार केला. तो नको म्हणत होता तरी मोठ्या शहरात त्याला घेऊन जायचं ठरवलं. पैशाची सगळी व्यवस्था परस्परच इतरांनी केली. धनदास आश्चर्यात पडला.

दोन तीन महिने उलटले. साधूदास बरा होऊन गावात आला. सगळ्या गावकऱ्यांना आनंद झाला. गावाने सत्यनारायणाची पूजा घातली. गोरगरीबांना अन्नदान दिले. सर्वांचं प्रेम मिळालं होतं साधूदासला. साधूदास आपलं दुःख दूर ठेवून दुसऱ्याशी समरस होत होता. अडीअडचणीला स्वकष्टाने लोकांच्या उपयोगी पडत होता. त्यांना मनापासून मदत करत होता. धनदास साधूदासला भेटायला आला.

" साधू, बरा होऊन आलास. बरं वाटलं. खूप पैसा खर्च झाला असेल नाही रे ? काही शिल्लक नसेल. मी मात्र चार पैसे बाळगून आहे. आता मात्र नीट वाग.... "

" धनदास किती वेडा रे तू. अजून तुला समजलं नाही. अरे आपण याच गावात लहानाचे मोठे झालो. माझ्या कुवतीप्रमाणे मी लोकांना अडीअडचणीला होईल तितकी पैशाची, कष्टाची मदत दिली. गरजेला उपयोगी पडलो. म्हणूनच मी तुला म्हणतो मी अगणित द्रव्य संपत्ती मिळवली. धनदास, तू औषधाची मुळी मागितलीस, तुला दामदुप्पट किंमत द्यावी लागली. पण माझा एवढा मोठा शहरी दवाखान्याचा खर्च सगळ्या गावाने

सोसला. शामभटजींचा सदा मोठ्या डॉक्टरांना घेऊन आला. मी दवाखान्यात होतो. गावानं माझं घर चालवलं. माझ्याजवळ तू म्हणतोस तशी नाण्यातली संपत्ती नव्हती. पण मला जगायला ह्या लोकांचं प्रेम, माया, दया मिळाली. मी हेच माझं धन म्हणतो. ह्या लोकांनी माझ्यावर इतकं प्रेम केलंय, अपार माया दिलीय म्हणूनच मी म्हणतो की तुझ्यापेक्षा माझ्याजवळ अगणित संपत्ती आहे. धन आहे. ह्या लोकांचं प्रेम हेच माझं अगणित धन." बोलता बोलता साधूदासाच्या डोळ्यांतून आसवं ओघळू लागली. धनदासानं ती आपल्या हातांनी पुसली आणि तो म्हणाला,

"साधू, खरं आहे. मी कोणाला मदत केली नाही. पैशाच्या मागे लागलो. मला वाटलं पैशानंच सगळं मिळेल. पण सुख, समाधान, प्रेम काही पैशानंच मिळत नाही. आपणही द्यावं लागतं. मी नुसता पैसे मोजत बसलो. खरी अगणित संपत्ती तुझ्याकडेच आहे. ती म्हणजे या गावाच्या लोकांचं प्रेम. त्यांची आपुलकी तीच खरी संपत्ती. साधूदास तू नेहमी म्हणायचा माझ्याजवळ अगणित संपत्ती आहे. आता मला समजून चुकली तुझी संपत्ती. खरंच ही संपत्ती तुला अगणित मिळाली आहे. पण आता मीही ती मिळवून दाखवीन. दुसऱ्यांना प्रेम, माया, आपुलकीनं जवळ करीन!"

दोघाही मित्रांनी एकमेकाला मिठी घातली.





पहाटेची वेळ होती. आणि अशा शांत थंड वेळी त्या घनदाट अरण्यातून गोड, मंजूळ स्वर ऐकू येत होते. झऱ्याच्या काठावर भल्या मोठ्या आंब्याच्या झाडाखाली बसून गाढव सुरेल, सुस्वर आवाजात देवाला आळवीत होतं. सगळे प्राणी, पक्षी त्याचे ते स्वर ऐकायला शांत बसले होते. खरंच किती गोड आवाज ! मधूर, सुरेल, सुस्वर. अरण्यात गाढवाच्या आवाजाची खूप तारीफ व्हायची. नेहमी अरण्यात संगीतसभा व्हायची वसंत ऋतूत आणि गाढवाला मान मिळायचा स्वरसम्राटाचा. असं नेहमीच व्हायचं.

यंदाही संगीतसभा जवळ येत चालली होती. सगळे पशु-पक्षी-प्राणी आपला आवाज खुला करण्यासाठी मोकळ्या मनानं गात होती कावळ्याची काव् काव्, चिमणीची 'चिव चिव' मनीचं 'म्यॅव म्यॅव' बदकाचं 'क्वॅक' 'क्वॅक' सारख चालू होतं. कोकिळाही आपला आवाज लावायची. पण कोणाचाच आवाज गाढवा-सारखा गोड नव्हता. तरीसुद्धा सगळी निदान व्यासपीठावर जाऊन मिरवता येईल म्हणून गाण्याची जशी येईल तशी तालीम करायची.

गाढवानं गाणं संपवलं. ते गानसमाधीतून जागे झाले. सगळे प्राणी सूर्य उगवलेला पाहून आपापल्या उद्योगाला गेले. कोकिळा मात्र गाढवाच्या समोरच बसून राहिली, तिला बघून त्याला आश्चर्य वाटलं. गाढव म्हणालं,

" हे काय कोकिळाताई आज चारा आणायला जायचं नाही का ? आणि आता आवाजासाठी मेहनत करायला लाग. संगीत-सभा जवळ आली."

" छे रे. आमचा कसला आवाज ! तुझा आवाज कसा मधा-सारखा गोड. सगळ्यांना गुंगवून टाकतोस तुझ्या आवाजानं. बघायलाच नको. यंदाही तुलाच स्वरसम्राट हा मान मिळणार."

" कोकिळाताई तूही मेहनत कर. तुलाही हा मान मिळेल एखादे वेळी."

" शक्य नाही··· पण एक जमलं तर ?" कोकिळा गाढवाकडे बघत म्हणाली,

" काय ते सांग ना"

" सांगू ? बघ हं. मग नाही म्हणशील." कोकिळा त्याला खुलवत म्हणाली.

" नाही म्हणणार नाही. सांग तुला काय वाटतं ते. तुझ्यासाठी करीन मी."

" गाढवदादा तू एवढा विचारतोस म्हणून सांगते. मलाही माहीत आहे तुझा स्वभावही गोड, उदार, सोशीक आहे. मला यंदाच्या वर्षी तुझा आवाज देशील का उसना ?"

गाढव जरा विचारात पडलं. काय करावं ते त्याला सुचेना.

कोकिळा त्याला म्हणाली,

" बघ बाबा. तुझ्या उदार मनाची खात्री होती म्हणून मागितला आवाज. तोसुद्धा कायमचा नको. तात्पुरता वर्षभर उसना. गाढवदादा, आम्हालाही वाटतं आपण स्वरसम्राज्ञी म्हणून मिरवावं. लोकांनी आमच्या आवाजाची तारीफ करावी "

कोकिळेचे ते दीनवाणे शब्द ऐकल्यावर गाढवाला नाही म्हणवेना. तिची विनवणी त्याला नाकारता येईना. एक वर्षभर बिचारी आवाज मागतेय. देऊ या तिला आवाज, असं गाढवानं ठरवलं.

" कोकिळाताई मी देतो तुला माझा आवाज. जा तुलाही यंदाच्या वर्षापुरतं स्वरसाम्राज्ञी होण्याचं भाग्य मिळू दे. पण लगेच परत दे हं माझा आवाज. "

" हो तर. लगेच परत देईन. एवढा तू मला आवाज द्यायला तयार झालास पण गाढवदादा, हे बघ आपण आपले आवाज बदलले हे कोणालाच सांगायचं नाही बरं का. अगदी शपथेवर सांग. "

" हो कोकिळाताई अगदी माझ्याच गोड गळ्याची शप्पथ. मी हे कोणालाच सांगणार नाही. "

गाढवाने लगेच कोकिळेला आपला आवाज दिला. कोकिळेने गाढवाचा गोड, सुरेल, सुस्वर आवाज घेऊन, त्याला आपला बसका, जाडाभरडा मोठा आवाज दिला.

त्या दिवसापासून कोकिळा व गाढव कुणालाच फारशी दिसली नाहीत. कोकिळा दूरवर जाऊन आपल्या आवाजाची करामत बघायची. गोड आवाज मिळाल्याने ती आनंदात होती. आपण स्वरसम्राज्ञी म्हणून मिरवत असल्याची स्वप्नं तिला दिवसरात्र पडायची. गाढव मात्र एकांतात सर्वांपासून लांब लांब रहायला लागलं.

कोकिळा रियाज करायला लागली की प्राण्यांमध्ये चर्चा चालायची.

हिरवागार पोपट साळुंकीला म्हणायचा " कमाल आहे हं. या कोकिळेचा आवाज गोड कसा झाला ? पहिल्याने हिचा आवाज अगदी ऐकवत नसे. पण आता नुसती गुणगुणते तर कसं कानाला गोड वाटतं. "

" अहो पोपटराव, नुसती पेरूची फोड खाऊन आणि डाळिंबाचे दाणे खाऊन नाही आवाज सुधारत. त्याला मेहनत लागते. कोकिळा बिचारी सारखी श्रम करतेय आवाज गोड व्हावा म्हणून. कष्टाचा मोबदला तिला मिळणारच. "

" मिळू दे ग. आपल्याला तो स्वरसम्राट किताबही नको आणि काही नको. मी नुसता सभेत नाव घेता म्हणून हजेरी लावतो आवाजाची. पण कोकिळेने कितीही मेहनत केली तरी खरा मान गाढवाचाच. " अशी प्रत्येक प्राण्यात, पशुपक्षांत चर्चा चालू होती. संगीतसभा जवळ येत होती.

संगीतसभेचा दिवस उजाडला. सगळं अरण्य गजबजून गेलं. सगळे पशु-पक्षी आनंदानं उडत बागडत होते. संगीतसभेसाठी हिरवीगार हिरवळ असलेल्या मैदानात एका उंचशा ओट्यावर पानाफुलांनी शृंगारून व्यासपीठ तयार केलं होतं. बहरलेल्या वेली तोडून तोरणं लावली होती. मऊ गवत घालून त्यावर फुलं पसरून अध्यक्षांना बसायला जागा केली होती. उन उतरलं. सगळे पशू, पक्षी, प्राणी हिरवळीवर जमली. अध्यक्षस्थानी सुंदर पिसाऱ्याचा मोर बसला होता. स्पर्धेला सुरुवात झाली.

चिमणी व्यासपीठावर गेली. भीत भीत उभी राहिली. नाजुक स्वर आला ' चिव् ' ' चिव् ' तिच्या पाठोपाठ कुत्रा गेला. स्वर लावलान्. साळुंकी आली. पोपटानं आवाज दिला. कोल्होबा आले

गळा मोकळा करून गेले. नंतर दिमाखात वाघोबांनी डरकाळी फोडली. सगळं रान थरारलं. पण स्पर्धेचा दिवस असल्याने कोणी कोणाशी दांडगाई, वैर करायचं नाही असा नियम होता. तरीसुद्धा ससा वाघाला घाबरत व्यासपीठावर चढला. आणि नंतर आली कोकिळा. तिला माहीत होतं. गाढव सभेला हजर होतं. सभेत भाग घेणार होतं. तरीसुद्धा तिलाच स्वरसम्राज्ञी किताब मिळणार होता. काळीभोर कोकिळा ऐटीत व्यासपीठावर चढली. सगळ्यांना मानेने अभिवादन करून तिनं स्वर लावला. सगळीच जिवाचा कान करून ऐकायला लागली, किती मधूर, किती गोड सुरेल आवाज. सगळी धुंद झाली. हे काय आश्चर्य झालं त्यांना कळेना. कुणी म्हणालं " कोकिळेने यंदा गळा कमावण्यासाठी खूप श्रम घेतलेत." कोणी म्हणालं, " थांबा हो, ही जरी गायली तरी अजून गाढवराज व्यासपीठावर यायचे आहेत. ते हिच्या वरताण स्वर लावणार. अहाहा काय आवाज गाढवदादाचा." झालं. सगळी गाऊन गेली. शेवटी आलं गाढव. आवाज लावलान् आणि मुकाट्याने खाली मान घालून निघून गेलं. त्याचा आवाज प्राण्यांना ऐकवेना. जाड, भसाडा, बसका आवाज ऐकून सगळ्यांना वाईट वाटलं. सगळी म्हणाली, " अरेरे नेमका आजच आवाज बसला ह्याचा. नशीब वाईट ह्याचं. ह्याचा मान यंदा कोकिळा मिळवणार. फार वाईट झालं." संगीतसम्राज्ञी हा किताब वर्षभर कोकिळेला मिळाला. सभा संपली.

आपल्या आवाजाचं कौतुक करवून घेण्यासाठी कोकिळा आंब्याच्या राईत सारखी 'कुऽहूऽ' 'कुहू' 'कुहू' कुहू' करीत बसायची. पहाटे सगळ्यांच्या आधी पंचम स्वर लावून देवाला आळवायची. गाढव मात्र वर्ष कधी संपतं ह्याची वाट बघत होतं.

कधीतरी गाढव एकटं असलं आणि कोकिळा जवळ असली तर ते तिला आठवण देण्यासाठी गेलं की ती पट्कन् उठून जायची. गाढव मनात म्हणायचं असू दे. कधी नाही तो गोड स्वर मिळालाय. घेऊ दे गाऊन. वर्षानं देइलच परत. "

वर्ष संपलं. आणि दुसऱ्याच दिवशी गाढव कोकिळा रहायची त्या झाडाखाली आलं. तो त्याला कळलं की कोकिळा शेजारच्या अरण्यात रहायला गेली. गाढव त्या अरण्यात जाऊन आलं. कोकिळा त्याला भेटेना. एक दिवस ती त्याला झऱ्याच्या काठावर दिसली. गाढव पळत तिकडे गेलं. आणि तिला हाका मारून म्हणालं,

" कोकिळाताई, थांब गं जरा. किती शोधतोय तुला. " गाढव आनंदून म्हणालं.

" हल्ली वेळच होत नाही रे. सारखी कामंधामं. हल्ली मी पलीकडच्या अरण्यात असते. बरं काय काम आहे. सांग लवकर. '

" कोकिळाताई, काम नाही काहीसुद्धा पण माझा आवाज परत दे. "

" काय म्हणालास ? तुझा आवाज ! " कोकिळा पंख फडफडून ओरडली.

" हो. माझा आवाज. मी तुला वर्षभर वापरायला दिला होता तो आता परत दे. वर्ष होऊन गेलं केव्हाच. "

" गाढवदादा तूं शुद्धीवर आहेस ना ? तुलाही माझ्या आवाजाचा हेवा वाटायला लागला वाटतं. माझा आवाज परत मागतोय. छान. चांगलं हं. " ती तडातडा बोलली.

" हे काय ग. मी माझा आवाज तुला गेल्या वर्षी संगीतसभेत भाग घेण्यासाठी उसना दिला. तू स्वरसम्राज्ञी किताब मिळवलास. आता माझा आवाज मला परत दे " अजीजीनं गाढव बोलत होतं.

" बघा बाई, कुणाचा आवाज घेतला मी ? तुझा आवाज दिला म्हणतोस मग त्याला काही साक्ष, पुरावा ? " ती लबाडीनं म्हणाली.

" तूच म्हणालीस कुणाला सांगायचं नाही. मी तुझा आवाज परत देईन... आणि आता माघार घेतेस. दे बरं माझा आवाज परत. "

गाढव निकरावर आलं. ते बघून ती लबाड कोकिळा त्याला मानभावीपणाने म्हणाली,

" गाढवदादा, खरं म्हणजे मी तुझा आवाज उसना घेतलाच नाही. तरीसुद्धा आता परत देण्याचा तुझा आग्रह असेल, तुला माझा गोड आवाज हवाच असेल तर एक अट घालते ती.... "

" सांग तुझी अट. ती मी पाळीन. पण माझा आवाज परत दे ..."

गाढव अधीर झालं अट ऐकायला. " हे बघ ह्या शेजारच्या नदीकाठी नगरीत, सगळीकडे खूप घाण, कचरा, उकिरडा साचलाय तो स्वच्छ कर...."

" हो हो, करीन स्वच्छ. हा बघ आत्तापासूनच सुरू करतो स्वच्छता करायला. " गाढव जायला वळलं मागे. पण त्याला थांबवीत कोकिळा म्हणाली,

" गाढवदादा, ज्या दिवशी मला कुठंही घाण, कचरा, उकिरडा दिसणार नाही त्या दिवशी तुझा आवाज तुला परत मिळेल. "

गाढवानं बरं म्हणून सांगितलं. आणि ते नदीकाठावर गेले. एका बाजूचा सगळा कचरा, घाण त्यानं काढून स्वच्छ केली. आणि त्याच पावली कोकिळेकडे परत आलं.

" कोकिळताई, बघ कसा नदीकाठ स्वच्छ केला. चल दे बरं आवाज परत. "

गाढव उतावीळपणे म्हणालं,

" अहो उतावीळराव जरा थांबा. नदीच्या एका काठावरची घाण गेली पण तो दुसरा काठ बघा. कित्ती ढीग केराचे. जा आधी ते स्वच्छ करा मग या आवाज न्यायला."

गाढव नाईलाजानं परत फिरले. त्यानं नदीच्या दुसऱ्या काठावरचा केरकचरा साफ केला. परत आले कोकिळेकडे. कोकिळेने दुसरीकडे बोट केले. गाढवाने ऐलतटावरचा, पैलतटावरचा, काठावरचा, अरण्यातला, जंगलातला, खेड्यातला, नगरीतला, शहरातला सगळीकडचा उकिरडा साफ केला. परंतु गाढवानं एका ठिकाणचा उकिरडा साफ केला की दुसरीकडे साठलेला असायचाच. गाढव अगदी वैतागलं. एक दिवस ते कोकिळेकडे येऊन म्हणालं,


" ताई, दे ग आता माझा आवाज परत. रोज उकिरडे साफ करतो. पण दुसरीकडे ते तयारच असतात. आता नको अंत पाहू. दे माझा आवाज परत. "

" हे बघ गाढवदादा, मी तुझा आवाज घेतला याला काही पुरावा नाही. आता तरीसुद्धा माझा आवाज मागतोस तर मी सांगितलेली अट पुरी कर. आणि त्याचवेळी हा आवाज तुला घेऊन जा. "

कोकिळा रागाने उडून गेली. अजूनही कोकिळा अरण्यात आपल्या सुस्वर आवाजात गात असते. " कुहूऽकुहूऽ " सगळे तिच्या आवाजाची स्तुती करतात. म्हणतात आवाज असावा तर असा कोकिळेसारखा. पण.... बिचारं गाढव अजूनही कधीतरी गावातले उकीरडे साफ होतील आणि आपला आवाज आपल्याला परत मिळेल या आशेवर रोज सकाळी उठल्यापासून नाकाने

फुंकून फुंकून उकिरडे साफ करायला बघते. नाईलाजाने रडतं, ओरडतं. त्याचा आवाज ऐकवत नाही. बिचारं असंच जगाच्या अंतापर्यंत उकिरडे साफ करत रहाणार.

भोळ्या बिचाऱ्या गाढवाचे उकिरडे साफ करणं संपणार नाही आणि त्याचा आवाज त्याला परत मिळणार नाही.





सूर्यदेव येणार म्हणून आभाळात आपल्याजवळचे सगळे रंग आकाशात पसरले. लाल, नारिंगी, केशरी, सोनेरी, पिवळा असे सगळे रंग आकाशात शोभून दिसायला लागले. निळे आकाश आणि त्यावर पसरलेले हे सगळे नवरंग. डोंगराच्या मागून सूर्य हळूच वर आला. त्याने आपले सोनेरी किरण अरण्यावर टाकले. हिरव्यागार गवतावर, झाडांवर, वेलीवर असलेल्या कळ्या फुलल्या. पांढऱ्या शुभ्र रंगाची फुलं वाऱ्यावर डोलू लागली. अरण्यातला झरा झुळझुळ करीत वाहू लागला. वारा आला आणि त्यानं फुलांना हळूच फुंकर घातली. सूर्य बघत होता. त्याच्या किरणांनी पांढरी शुभ्र फुलं आपल्या नाजूक पाकळ्या उघडीत हळूच फुलून बसली होती. खूप आवडली सूर्याला ती पांढरी शुभ्र फुलं !

सूर्य भराभर वर येत होता. पांढरी शुभ्र फुलं नाचत होती, गात होती, डोलत होती.

तेवढ्यात फुलाजवळ असलेला मध खाण्यासाठी पाखरांचा थवा आला.

छोटी पांखरं त्यांचे नाजुक पंख हलवित होती. काळ्याभोर

गोल डोळ्यांनी फुलाकडे बघत होती. सूर्य बघत होता. फुलांचा रंगही पांढराच आणि पांखरांचाही पांढराच. पांढरी फुलं आणि पांढरीच पांखरं !

दिवसभर चालून सूर्य दमला. संध्याकाळी आपल्या सगळ्या किरणांना घेऊन तो डोंगरामागच्या आपल्या महालात विश्रांती-साठी निघून गेला.

सूर्य महालात शिरलेला बघताच रात्र हळूच अरण्यात आली. आणि तिने चांदोबाला हाक मारली. चांदोबा आला तशा त्याच्या-बरोबर त्याच्या मैत्रिणीही आल्या. त्यांच्या लपाछपीचा डाव सुरू झाला. ढगाआड लपलेल्या चांदोबाला शोधायला चांदण्या लुकलुकू लागल्या. सगळीच रमली त्या खेळात.

आणि तेवढ्यात परीराणीनं त्या हिरव्यागार अरण्यात प्रवेश केला. निळ्या डोळ्यांची, सोनेरी केसांची, गुलाबी रंगाची नाजुक परी. चांदण्यांची नक्षी काढलेली, सुंदर निळी साडी नेसलेली परी-राणी अरण्यात आल्याबरोबर सगळ्यांना खूप आनंद झाला. परीराणी आपले सोनेरी नाजुक पंख हलवित पायातल्या पैंजणाचा मधूर नाद करीत त्या हिरव्यागार गवताच्या गालिच्यावरून हिंडत होती. तिच्या सख्याही तिच्याबरोबर आल्या होत्या. सगळ्यांचं लक्ष त्या फुलाकडे जात होतं. बिचारी फुलं आपल्या पाकळ्या मिटून झोपली होती. वेली झोपल्या होत्या. झाडं झोपली होती. डोंगर झोपले होते. सगळीकडे शांतता होती. झरासुद्धा शांत होता.

"परीराणी, मी जरा माझा नट्टापट्टा पाहून येऊ का ग झऱ्याच्या आरशात." छोट्या परीनं विचारलं.

"हो, जा ना. पण लक्षात ठेवा बाईसाहेब, झऱ्यात थाट

पहायला जाल आणि पाय घसरून पडलात तर सगळा पोशाख भिजून जाईल."

"अहं, मी हळूच जाईन आणि बघून येईन. जाऊ का?"

"जा." परीराणीनं तिला हसत सांगितलं. तेवढ्यात दुसरी परी परीराणीचा हात धरून म्हणाली,

"परीराणी चल ना ग, आपण वेलीच्या झोपाळ्यावर मोठ्ठा झोका घेऊ."

परी म्हणाली, "मी नाही येत. तुला हवं तर तू जा. पण सांभाळ हं, झोका हळूच घे."

दुसरी परी आपले सोनेरी पंख पसरवून निघून गेली. परीराणीच्या सगळ्या मैत्रिणी खेळायला गेल्या. कुणी वेलीच्या झोपाळ्यावर, कुणी हिरव्या गवताच्या गालिच्यावर, कुणी झऱ्याच्या काठावर, कुणी डोंगरमाथ्यावर, कोणी झऱ्याच्या नादावर गाणी म्हणत होत्या, कोणी झाडाशी लपंडाव खेळत होत्या. परीराणी एकटीच बसली. खूप वेळ झाला. तिच्या मैत्रिणी खेळातच रंगून गेल्या. एकटं बसून तिला खूप कंटाळा आला. तेवढ्यात तिच्या मनात एक कल्पना आली आणि तिला खुदकन हसू आलं.

परीराणी चटकन उठली. तिनं पानाचा एक द्रोण केला. हळूच झऱ्यावरचं पाणी आणलं त्या द्रोणात. ढगांचे रंग त्या पानाच्या द्रोणात मिसळले. गवताचा नाजुक कुंचला तयार केला. आणि हळूच आपले पंख मिटून घेऊन ती झोपलेल्या कळ्याजवळ आली. आपल्या नाजुक हातानं तिनं एकेक पाकळी रंगवून टाकली. बराच वेळ खेळात रंगली परी कुणाच्या अंगावर गडद गुलाबी, कुणाला निळा, कुणाला पारवा, कुणाला हिरवा, कुणाला ठिपके, कुणाला

रेषा असं सगळ्या फुलांना तिनं रंगवून टाकलं. आणि गालात हसत ती चटकन दूर निघून गेली पहाटेला सगळ्याजणी आपल्या घरी निघून गेल्या.

सकाळ झाली. पांखरं किलबिलू लागली. पक्षी गाऊ लागले. झरा वाहू लागला. वारा धावू लागला. डोंगरांनी माना उंच केल्या. झाडांनी शेंडे उंचावले. वेली झुलू लागल्या. गवत डोलू लागलं. सूर्याच्या किरणांनी अरण्यात धाव घेतली. फुलं फुलली.

अन् काय आश्चर्य ! डोंगर, झरा, झाडं, वेली, पक्षी सगळे फुलाकडे अचंब्याने पहायला लागले.

किती मोहक दिसत होती फुलं. किती रंग, किती रंगछटा. कुणाला ठिपके, कुणाला रेषा. कुणाला गडद लाल. कुणाला पिवळा, कुणाला निळा. कुणाला जांभळा. सगळ्या रंगात फुलं रंगली होती.

ते पाहून सगळ्यांना आनंद झाला. वाऱ्याची झुळूक आली. फुलांना हसवून गेली. वेली आनंदानं डोलायला लागल्या. झरा गाऊ लागला. पक्ष्यांनी किलबिल करून त्याला साथ दिली. तळ्याच्या पाण्यात फुलांनी आपले रंग पाहिले आणि ती आनंदानं डोलायला लागली, तेवढ्यात पांखरांचा थवा फुलाजवळ आला. पांखरांनी आपले काळेभोर गोल डोळे मिचकावले, पांढरे शुभ्र पंख नाजुकपणे हलवले आणि ती फुलांना म्हणाली,

" कित्ती छान दिसता रे फुलांनो ! किती रंग ! कसे छान ठिपके आणि रेषा ! कुणी दिले रे रंग तुम्हाला ?"

" आवडले ना रंग ?"

" हो तर. खूप आवडले. पण कुणी दिले ते सांगा ना ?"

" आम्हाला नाही माहीत. काल आम्ही झोपलो. सकाळी बघतो तर आमच्या पाकळ्यांना हे रंग कुणी दिले कुणास माहीत. "

"मी सांगू का ? काल रात्री पऱ्यांची राणी आली होती ना तिनंच दिले असतील." लाल लाल कमळाचं फूल म्हणालं.

"आता परी आली की आम्ही पण मागू असले रंग. आपल्या नाजुक, लहान पांढऱ्याशुभ्र पंखावर किती छान दिसतील असले रंग !" पांखरं लोभावून म्हणाली.

पांखरांना फुलांच्या मनमोहक रंगाचं वैषम्य वाटलं. ती परी-राणी कधी येते त्याची वाट बघत बसली. त्यांना फुलांचे रंग फार आवडले. आपल्या पांढऱ्या रंगाचा त्यांना आता कंटाळा यायला लागला.

खूप दिवस झाले. पांखरं रोज परीची वाट बघत होती. पण परी येत नव्हती. ती अधीर झाली अगदी. एक दिवस त्यांनी ठरवलं फुलांचे रंग चोरून घ्यायचे. अगदी हळूच. फुलांना नकळत.

रात्री फुलं आनंदात झोपली होती. गडद काळोख होता. अरण्यात सगळी गाढ झोपली होती. पाखरांनी हळूच आपले पंख फुलांच्या पाकळ्यांवर फिरवले आणि फुलांचे रंग चोरून घेतले. मग हळूच ती निघून गेली.

सकाळी बघतात तो काय फुलांचे रंग पांखरांच्या पंखावर. फुलांचे रंग मात्र फिके पडत चालले. फुलांना कळेना काय झाले. त्यांनी पांखरांना विचारलं,

"तुम्हाला कोणी दिले रे रंग ?"

पांखरं आढ्यतेनं म्हणाली, "आम्हाला काय माहीत ? रात्री आम्ही झोपलो. सकाळी बघतो तर तुमच्यासारखेच रंग आमच्या पंखावर. आमच्या नाजुक पांढऱ्या पंखावर किती छान दिसतात नाही हे रंग ?" पांखरं वेलीवर नाचत बागडत म्हणाली.

पांखरं आपले रंगीत पंख हलवीत, अंगावरच्या रेषा खुलवीत

ठिपक्यांचं सौंदर्य इतरांना दाखवीत आनंदानं ह्या फुलावरून त्या फुलावर मध गोळा करीत हिंडत होती.

बरेच दिवस निघून गेले. अशाच एका रात्री परीराणी आपल्या सख्यांना घेऊन अरण्यात आली. सख्या खेळायला जाणार असं म्हणताच ती त्यांना म्हणाली,

" सख्यांनो, आज मी तुम्हाला एक गंमत दाखविणार आहे. आपल्या या अरण्यात खूप पांढरीशुभ्र फुलं होती ना, त्यांची. चला ग सगळ्याजणी. अगदी गुपचुप जायचं. फुलांना कळता कामा नये. हळूच हं. "

" परीराणी आधी सांग काय गंमत केलीस ती ? " छोटी परी म्हणाली.

" सांगू–मी किनई सगळ्या फुलांना खूप छान रंग दिलेत. मला नाही आवडत तो फुलांचा रंग. आता किती छान दिसतात फुलं. कुणाला रेषा, कुणाला ठिपका, कुणाला गडद, कुणाला फिका. चला लवकर. "

सगळ्याजणी परीच्या मागोमाग फुलाजवळ गेल्या. सगळ्यांनी हळूच फुलांच्या पाकळ्या उघडल्या. आणि बघतात तो काय ? सगळ्या फुलांचे रंग फिके झालेले.

" हे काय, कुठायत रंग. आम्हाला सांगितलंस छान छान रंग दिले. हे कसले रंग. सगळे चोरलेत कुणीतरी. "

सगळ्या मैत्रिणीसमोर आपली फजिती झाली म्हणून परी-राणीला खूप राग आला. ती रागानं ओरडली,

" कुणीतरी सगळे रंग चोरलेले दिसतात. उठा रे फुलांनो. " तिच्या रागीट शब्दांनी फुलं दचकून जागी झाली. ती बावचळून गेली. तेवढ्यात मोठं धीट झेंडूचं फूल म्हणालं,

" परीराणी आम्ही रात्री गाढ झोपेत होतो. आम्हाला नाही माहीत कुणी रंग चोरले ते. पण.... एक सांगू का ? पांखरांच्या अंगावर मात्र असेच रंग दिसतात आमच्यासारखे. अगदी हुबेहुब तस्सेच. पाखरांना विचारलं, तर म्हणाली, परीराणीनी दिले."

" पांखरं खोटं बोलतात. मी तुम्हाला रंग देऊन गेले ती आज आले अरण्यात. नक्की पांखरांनीच रंग चोरले असणार."

परीराणीने पांखरांना बोलावणं पाठवलं. पांखरं आनंदात गाढ झोपली होती. ती खडबडून जागी झाली. खूप घाबरली. सगळी पांखरं परीराणीचा निरोप आल्यावर पंख फडफडत उठली. आणि नाईलाजानं परीराणीसमोर हिरवळीवर विसावली.

" पांखरांनो, खरं सांगा. फुलांचे रंग कुणी चोरले." परीराणीने दरडावून विचारलं.

" आम्हाला काय माहीत ? आम्ही नाही चोरले रंग." पांखरं बिचकत म्हणाली.

" पांखरांनो, तुम्ही खोटं बोलता. तुम्हीच फुलांचे रंग चोरलेत. ह्या तुमच्या गुन्ह्याबद्दल तुम्हाला शिक्षा झालीच पाहिजे. जा उद्यापासून तुम्हाला फुलं आपल्यातला मध देणार नाहीत. चोरीचं प्रायश्चित्त म्हणून तुम्हाला उपाशी मरावं लागेल." रागानं लाल होऊन परीराणी म्हणाली.

पांखरं घाबरली. त्यांच्या डोळ्यासमोर अंधारी आली. शेवटी त्यांच्यातल एक छोटं पाखरू धिटाईनं पुढं झालं. परीराणीच्या पायाशी बसून ते हळूच म्हणालं,

" परीराणी, तू आम्हाला का ग असे रंग दिले नाहीस, आमच्या नाजुक पंखावर किती छान दिसतील. खरं सांगू का आम्हाला त्या रंगाचा मोह झाला म्हणून आम्हीच चोरले ते रंग. रागावू नको.

आम्ही पुन्हा नाही रंग चोरणार." परीराणीला त्या लहान पांखराचं बोलणं पटलं. ती त्या पांखराला म्हणाली,

"बाळा, शाबास, खरं ते कबूल केलंस."

"परीराणी आम्हाला क्षमा कर. आता नाही आम्ही काही चोरणार." सगळी पाखरं पुढे होऊन म्हणाली.

"ठीक आहे. तुम्ही आपला गुन्हा कबूल केलात हे बरं झालं. छोट्या पांखराचं म्हणणं मला पटलं. खरंच, तुमच्याही पंखावर छान दिसतील हे रंग. आता मी तुम्हालाही रंग देणार आहे. पण एक काम तुम्हाला करावं लागेल. तुम्ही फुलांचे रंग चोरलेत तेव्हा, आता जशी तुम्हाला फुलं आपला मध देतील तसंच तुम्ही त्यांना त्यांचे पराग दूरवर न्यायला मदत करा. कारण फुलांना दूर जाता येत नाही. आहे कबूल."

"होय परीराणी, आम्ही जरूर पराग दूरदूर नेऊ आणि फुलांच्या वाढीला मदत करू. पण तू आम्हाला लवकर रंग दे."

परीराणीने तिच्या सख्यांना गवताचा कुंचला आणायला सांगितलं. कुणी झऱ्याचे पाणी पानांच्या द्रोणात घेऊन आल्या. परीराणीने आपल्या नाजुक हातानी ढगांचे रंग आणून पाण्यात कालवले. आणि सगळ्यांनी फुलांना आणि पाखरांना रंग भरले.


"फुलांनो, पांखरांना मध देत जा. पांखरं तुमचे पराग दूर नेतील. आजपासून तुमची व या पांखरांची मैत्री. म्हणूनच ह्या मैत्रीचं प्रतीक म्हणून ह्या पांखरांचं नाव आजपासून फुलपांखरं, फुलपांखरं !"

फुलांचे आणि फुलपांखरांचे ते रंग बघायला सूर्याला बोलावून आणायला रात्र लगेच निघून गेली. सूर्य गडबडीत आला. किरणांनी

फुलांवर आणि फुलपांखरांवर झेप घेतली. फुलांचे आणि फुल-पांखरांचे रंग खुलून दिसायला लागले.

पानांची सळसळ सुरू झाली. झरा झुळूझुळू लागला. डोंगरांच्या माना उंचावल्या. झाडांनी तलावात आनंदानं डोकावायला सुरुवात केली. सगळं अरण्य आनंदलं. वाऱ्याची लहर आली आणि नद्यांना डोंगरांना, झऱ्यांना, झाडांना, वेलींना, गवतांना सांगत सुटली,

" बरं का रे आजपासून ह्या फुलांच्या आणि पांखरांच्या मैत्रीचं प्रतीक म्हणून ह्या पांखरांचं नाव फुलपांखरं ! फुलपांखरं ! ! "






दिवेलागणी झाली. अंधार झाला. खेड्यातल्या घरात दिवे लागले. गाई गुरांचे कळप घरी परतले. त्यांच्या हुंदडण्याने नदीकाठचा रस्ता धुराळ्याने भरून गेला. गाईंच्या मागून येणाऱ्या देवदासनं हातातलं उसाचं कांडं दूर टाकलं आणि झपाझप पावलं टाकीत तो घराकडे निघाला. त्याच्या समोरूनच गावातल्या गोदूबाई, साळूबाई, रमाबाई, चंद्रा हातातली कळशी सावरत डोक्यावरचे पाण्याने भरलेले हंडे तोलीत चालल्या होत्या. त्यांच्यात बोलणी चालू होती.

" रमा चला ग झपाझपा. काळोख दाटलाय. आज फार उशीर झाला पाणी न्यायला. "

" काय करायचं ! घरचं दळण संपवलं. पाहुणे दारात आले.

त्यांचं चहापाणी आवरलं आणि तडक आले हंडा घेऊन नदीवर!" रमा कुरकुरत बोलली.

"बाई ग मला पण आज उशीर झाला. ह्या साळूबाई आहेत म्हणून बरे. त्या करवंदीच्या जाळीतून जायचं म्हणजे भीतीच वाटते." चंद्रा घाबरत म्हणाली.

त्याना घाबरलेलं पाहून देवदासच्या मनात त्यांची फजिती करण्याचा विचार आला. तो त्यांच्यापासून आडवाटेने सटकला आणि करवंदीच्या जाळीत लपून बसला.

चौघी घाईनं चालत होत्या. कडेवर पाण्याची कळशी, डोक्यावर हंडे घेऊन त्या चालत होत्या. रातकिडे किर्रऽ ओरडत होते. तिघी करवंदीच्या जाळीत आल्या. आणि एकदम "भू–भू: भोऽ" असं ओरडत कुत्र्यानं त्यांच्यापुढे उडी घेतली. चौघी घाबरल्या. भीतीनं किंचाळल्या. त्यांच्या डोक्यावरचे पाण्याचे हंडे खाली पडले. कळशातलं पाणी रस्त्यावर सांडलं.

"अग बया–कुत्रं–ए हाड हाड मेल्या– साळू अग मार दगड!"

रमाबाई भीतीनं ओरडली. तिघी एकमेकींना धरत मागे पळाल्या.

तेवढ्यात त्यांना मोठ्यानं हसण्याचा आवाज ऐकू आला. मागोमाग शब्द आले.

"कशी झाली फजिती! पाणी गेलं वाहून, आता आणा पुन्हा पाणी... खो–खो–खो." देवदास हसत हसत बोलला.

साळूबाईंनी त्याचा आवाज ओळखला. त्या अंधारातून पुढे आल्या आणि त्याचा कान पकडीत म्हणाल्या,

"कोण रे मेल्या? तू होय नकल्या! सगळं पाणी सांडवलस. कुत्र्याचा आवाज काढून भीती दाखवतोस होय रे?

" साळूबाई, सोड आधी माझा कान. कळ आली बघ. " देवदास रडत ओरडत कळवळून बोलला.

" चांगला पिरगळ त्याचा कान. काय बाई घाबरले मी. आधीच उशीर झालाय. अंधारात भुताची भीती वाटली तर ह्यानं चांडाळानं भीती दाखवली कुत्र्याच्या आवाजाची. " रमा रागावून बोलली.

सगळ्यांनी त्याला धपाटे घातले. पुन्हा सगळ्याजणी रागानं पाणी घेऊन आल्या. साळूनं आपला हंडा देवदासच्या डोक्यावर दिला। आणि त्याला दम देत ती म्हणाली,

" चल आता तुझ्या पाठची सालटी काढते बघ उद्या येऊन. फार मस्ती करतोस. शाळा शिकायची नाही. ह्याची नक्कल कर त्याची कर. नकल्या मेला. "

रस्ताभर साळूची बडबड चालली होती. भिजलेले पातळ ती एकीकडे पिळत होती आणि मग देवदासला रपाटा घालीत होती.

पाण्याचा हंडा डोक्यावर घेतल्याने देवदासची मान अवघडली. साळूबाईंनी त्याला तस्साच घरापर्यंत नेला. घरी येऊन न जेवता देवदास तसाच झोपून गेला. त्याला आतां भीती वाटत होती उजाडता नक्की साळूबाई येऊन आईला सांगणार आणि मग आईच्या हातचा मार. विचार करत तो पडला. जागचं उठवत नव्हत त्याला. विचार करता करताच त्याला झोप लागली.

उजाडता तो जागा झाला तो साळूबाईच्या गरजण्यात.

" काय झालं साळूबाई ? कां ओरडतां ? पोरगं उठेल माझं. " त्याची आई साळूबाईना म्हणाली.

" झोंपलाय तर उठव त्याला. नकल्या मेला. सारखा सगळ्यांच्या ओरडण्याच्या नकला करतो. काल पाणी आणायला गेले. कुत्र्याचा

आवाज काढलान्. जी घाबरगुंडी उडाली. सगळं पाणी सांडलं विचार मेल्याला – जा उठव आधी."

साळूबाईला मागे सारून पाटलीण पुढे होत म्हणाली,

" अग तुझ्या अंगावर नुसतं पाणीच. परवा माझी धाकटी सून दुधाचं पातेलं कपाटात ठेवीत होती. खिडकीतून यानं मांजराचा आवाज काढला. धाप्कन पातेल पडलं पायावर. पाय भाजला गं पोरीचा. आता सारखी लंगड फुगडी घालतेय."

जोरजोरात आळीतल्या सगळ्या बायका येऊन गाऱ्हाणी सांगू लागल्या. देवदासाची आई त्रासून गेली. तिनं देवदासला ओढीत पुढे आणलं.

" हे बघा देवदासच्या आई. आता मात्र ह्याचा बंदोबस्त करा. लहान आहे नकला करतो म्हणून पहिल्यानं कौतुक केलं गावानं. पण असा त्रास झाला तर गावाबाहेर हाकून देऊ."

साळूबाईचा नवरा रागावून बोलला. त्याचे ते शब्द ऐकताच देवदासच्या आईने हातात काठी घेतली आणि त्याला ओढून ती तवातावाने म्हणाली,

" मर मेल्या. बाप नाही म्हणून लाड केले. सगळ्या गावाला त्रास झालाय. नकला करतोय जा मेल्या. आधी तोंड काळं कर. फार त्रास दिलास." काठीचा तडाखा बसणार तेवढ्यात आईचा हात हिसकून देवदास बाहेर पळाला.

त्याच्या आईचं ओरडणं त्याला ऐकू येत होतं.

" नकला करतोय गावाच्या. आता नकला करून काय दिवे लावणार आहे! मी घातलं राबून पोटाला. आता जा कर नकला आणि मिळव पैसा बघू तुझी हिंमत – नकल्या मेला." आई रागानं फुणफुणत होती.

आईचं रागाचं बोलणं ऐकून देवदास जो पळाला तो लांब रानातल्या मारुतीच्या देवळात येऊन बसला.

सात आठ वर्षाचा देवदास. काळा, सांवळा तरतरीत चेहऱ्याचा. वडील लवकर वारले. आई मोलमजुरी करून दोघांचं पोट भरायची. आईला वाटायचं, पोरानं शाळेत जावं. शिकावं. पण देवदासचं शिकण्यात लक्ष लागत नव्हतं. त्याला नकला करायला आवडायचं. प्राण्यांच्या ओरडण्याची, वाघाची सिंहाच्या आवाजाची तो नक्कल करायचा. सगळी मुलं त्याच्यावर खूष व्हायची. देवदास शाळेत गेला आणि गुरुजी शिकवायला लागले की हळूच काहीतरी आवाज काढायचा. सगळ्या वर्गाचं लक्ष अभ्यासावरून उडायचं. मास्तर मारायचे ' पुन्हा असं करणार नाही ' असं सांगून देवदास शाळेत यायचा. आणि पुन्हा " येरे माझ्या मागल्या " कधी वाघाची गर्जना, कधी सिंहाचा नाद, कधी मांजराचा आवाज तर कधी बकरीचा !

एकदा शाळा भरली. मास्तरांना वर्गावर यायला उशीर झाला. ते वर्गात शिरणार तेवढ्यात एकदम देवदास दाराआडून ओरडला, " भोऽ भोऽ "

मास्तर दाणकन् खाली कोसळले. नाकावरचा चष्मा दूर उडाला. हातातली पुस्तकं खाली पडली. रूळ पायाशी गडगडला. खडूच्या कांड्या मास्तरांच्या अंगाखाली चुरडल्या. सगळी मुले त्यांना पडलेले बघून हसत सुटली.

आधीच मास्तर काळे, त्यात त्यांच्या तोंडाला खडूची पांढरी भुकटी लागली. एक मुलगा हळूच ओरडला,

" कसा दिसतोय खारा शेंगदाण [illegible] स्तर

IRBK-0116245

तिरीमिरीने उठले. आणि त्यांनी देवदासला मारायला धाव घेतली. देवदास उघडचा खिडकीतून पळाला तो पुन्हा शाळेत आला नाही.

देवदास रात्रभर जागा राहिला. त्यालाही वाटायचं शहाणं व्हावं पण कधी कधी नकलेची लहर यायची त्याला. तो मनात म्हणाला,

" आई जा म्हणालीस तर हा चाललो. पुन्हा घरी येईन तर पैसा मिळवीन आणि मगच तुला तोंड दाखवीन. ह्या नकल्या देवदासालाच सगळे लोक मानतील. मगच येईन गावात. "

सकाळी देवदास लवकर जागा झाला. त्यानं देवाजवळ फोडलेल्या खोबऱ्याचे तुकडे गोळा केले. झऱ्यावर तोंड धुतलं. खोबरं खाऊन तो रानातल्या वाटेने दूर दूर निघाला, गावापासून.

चालता चालता थकून तो एका झाडाखाली विसावला. त्याला दमल्यामुळे गाढ झोप लागली. झोपेतून जागा झाला तेव्हा त्याला दिसलं की कुणीतरी आपल्याला हलवून जागं करीत आहे. देवदासनं डोळे चोळले आणि तो उठून बसला.

" ये बाळा ऊठ. एकटा काय झोपलास ?" दिवेलागणी झालीय. घरी नाही का जायचं ? कुणीतरी विचारीत होतं.

" मी नाही जा घरी जाणार " देवदासने उठवणाऱ्या माणसाचा .त झिडकारला.

" अरे बाबा, समोर बघ. अक्कलपूरचे महाराज चाललेत राजधानीत परत. शिकारीला गेले होते. त्यांनीच तुला एकटा झोपलेला बघितला आणि मला उठवून आणायला पाठवलं. चल. "

" मी येणार नाही ··· जा ··· चल " " व्यँ " ' व्यँ ' " देवदासनं त्याला बकरीचा आवाज काढून मान वाकडी करून वेडावलं.

" वा ! काय छान नक्कल केलीस बकरीच्या आवाजाची. चल महाराजांना आवडेल. गुणांची पारख महाराज नेहमीच करतात. मी अक्कलपूरचा प्रधान आहे. "

आपल्या नक्कल करण्याला चांगलं म्हटलं म्हणून देवदासला आनंद झाला.

तो महाराजांच्या समोर उभा राहिला. महाराजांना त्याने पुन्हा बकरीच्या ओरडण्याची नक्कल करून दाखवली. महाराजांनी त्याची माहिती विचारली. देवदासनं अगदी सगळी खरी हकीगत सांगितली. ती ऐकून महाराज म्हणाले,

" देवदास, अरे असा कुणाला त्रास देऊ नाही. आपल्याला जी कला येते ती सत्कारणी लावावी. आत्ता तू काय छान नकला करून दाखवल्यास सगळ्या प्राण्यांच्या. ओरडण्याच्या. पण गांवातल्या लोकांना भीती दाखवलीस, त्यांची फजिती केलीस म्हणून सगळे चिडले. हे बघ आतां आमच्याबरोबर चल. मी तुला राजकुमाराबरोबर शिकवीन. चांगला मोठा हो. प्रधानजी घ्या ह्याला आपल्याबरोबर. बाळ नाव काय म्हणालास तुझं "

राजाने मायेनं विचारलं.

" माझं खरं नाव देवदास. पण सगळे नकल्या म्हणतात. "

" छान. योग्य नाव. नकल्या हा तुझा स्वभावच देशाच्या कारणी लाव. "

सगळे अक्कलपूरला पोचले. नकल्या देवदासला राजकुमार खूप आवडला. दोघांची गट्टी जमली. राजकुमाराला देवदास नेहमी नकला करून दाखवायचा. राजकुमाराबरोबर देवदासाचंही शिक्षण सुरू झालं.

एकदा अक्कलपूरला मोठी सर्कस आली.